**मटा अँकर** | **कुलाबा ते सीप्झ मार्गावर आजपासून चाचण्या**

# भुयारी मार्गिकेवर मेट्रो धावणार

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

बहुप्रतीक्षित कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ या मुंबईच्या पहिल्या भुयारी मेट्रो मार्गिकेवरून आज, मंगळवारी प्रथमच मेट्रो गाडी धावणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गाडीला हिरवा झेंडा दाखवल्यानंतर या मार्गावरील चाचण्यांना सुरुवात करण्यात येणार आहे. सारिपूतनगर ते मरोळ नाका या ३ किमी अंतरावरील भुयारी मार्गावर मेट्रोच्या चाचण्या घेतल्या जाणार आहेत. पाच वर्षांपासून मुंबईकरांना या मेट्रो प्रवासाची प्रतीक्षा आहे.

२०१७मध्ये मेट्रो ३ प्रकल्पाला सुरुवात झाली. त्यानंतर डिसेंबर २०२१पर्यंत मेट्रो गाडी प्रत्यक्षात धावणे अपेक्षित होते. मात्र हा प्रकल्प विविध कारणांनी रखडला होता. पुढीलवर्षी डिसेंबरमध्ये पहिली भुयारी मेट्रो मुंबईकरांच्या सेवेत दाखल होण्याच्यादृष्टीने एक टप्पा सुरू होत आहे. या महिन्याच्या सुरुवातीला मेट्रो गाडी मुंबईत दाखल झाली होती. या गाडीतील विविध यंत्रणेच्या चाचण्या पूर्ण करून ती आता 'ट्रायल रन'साठी सज्ज झाली

(पान १०वर)



**वैशिष्ट्ये**

- ही मेट्रो गाडी स्वयंचलित असेल
- वातानुकूलित व आर्द्रता नियंत्रण यंत्रणा
- प्रवाशांच्या मनोरंजन व जाहिरातीसाठी एलसीडीचा वापर
- मार्गिकेचा डिजिटल नकाशा
- प्रवाशांसाठी उद्घोषकांचा वापर
- चांगल्या बैठक व्यवस्थेसह उभे राहण्यासाठी खांबांची व्यवस्था
- दिव्यांग प्रवाशांसाठी व्हीलचेअर ठेवण्याची स्वतंत्र व्यवस्था
- प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही
- आगीपासून संरक्षणासाठी प्रत्येक डब्यात अग्निशमन, धूर व अग्निशोधक यंत्रणा
- आपत्कालीन परिस्थितीत प्रवासी व गाडी नियंत्रक यांच्यामध्ये संवादासाठी ध्वनियंत्रणा

# भुयारी मार्गिकेवर मेट्रो धावणार

(पान एकवरून)

आहे. मेट्रो ३च्या सारिपूतनगर येथील तात्पुरत्या कारशेडपासून ते मरोळ नाक्यापर्यंत पुढील काही महिने ही मेट्रो धावणार आहे. त्यादरम्यान गाडीतील यंत्रणेच्या आणि मार्गिकेच्या विविध चाचण्या पार पडतील.

## समुद्राच्या प्रवाहाशी साधर्म्य

अलस्टॉम कंपनीकडून मेट्रो ३ मार्गिकेसाठी मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (एमएमआरसी) ३१ गाड्या खरेदी करणार आहे. अ‍ॅक्वा ग्रीन आणि बेज (फिका पिवळा) रंगातील ही मेट्रो गाडी आहे. समुद्राच्या लाटांचा प्रवाहीपणा, वाहत्या पाण्याचा ताजेपणा, गती आणि आरामदायी प्रवास यांपासून प्रेरणा घेऊन



या डब्यांची रंगसंगती निश्चित करण्यात आली आहे. या गाडीच्या प्रत्येक डब्याचे वजन ४२ टन आहे.

## कारशेडचा पहिला टप्पा एप्रिल २०२३पर्यंत

आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा सुरू करण्यासाठी एमएमआरसीला ९ मेट्रो गाड्यांची आवश्यकता आहे. पहिल्या टप्प्यातील या गाड्या उभ्या करण्यासाठी आवश्यक कारशेडची सुविधा एप्रिल २०२३पर्यंत पूर्ण केली जाणार आहे. तर संपूर्ण कारशेड जुलै २०२३पर्यंत उभारण्यात येणार आहे. एमएमआरसीच्या सुरुवातीच्या नियोजनानुसार मेट्रो ३चा पहिला टप्पा डिसेंबर २०२१मध्ये सुरू केला जाणार होता. मात्र विविध कारणांनी हा प्रकल्प रखडला आहे. पहिला टप्पा डिसेंबर २०२३पर्यंत करण्यासाठी जून २०२३पर्यंत सर्व कामे पूर्ण केली जाणार आहेत. तर उर्वरित मार्ग जून २०२४पर्यंत सुरू केला जाणार आहे.